# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

---

क्र. कोविमं/ए-२/ १२ वी गोप./प्रात्य./तोंडी/ 2896
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक : १६/०१/२०२३.

प्रति,
प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळ कक्षेतील,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२३ च्या तोंडी/ प्रात्यक्षिक/ श्रेणी परीक्षेचे साहित्य स्विकारणेबाबत.**
**संदर्भ:- क्र.कोविमं/ए-२/ उ.मा./फेब्रु-मार्च २०२३/२८६०/ दिनांक १३/०१/२०२३ चे पत्र.**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी / मार्च २०२३ परीक्षेच्या शास्त्र, तंत्र, व्यावसायिक आणि किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा तसेच भाषा विषयांची तोंडी परीक्षा **दिनांक ०१/०२/२०२३ ते दिनांक २०/०२/२०२३** या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. तरी प्रात्यक्षिक परीक्षचे साहित्य **दिनांक २८/०१/२०२३** रोजी **सकाळी १०.०० ते ४.००** या वेळेत वितरण केंद्रावरून वितरीत करण्यात येणार आहे. सदर साहित्य घेतल्यानंतर ते बरोबर असल्याची खात्री करावी. साहित्य कमी / जास्त असल्यास तात्काळ वितरण केंद्र प्रमुखांशी संपर्क साधण्यात यावा. त्यानंतरच वितरण केंद्र सोडावे. तद्नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही. वितरण केंद्रावरून साहित्य स्विकारण्यास विलंब केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित कनिष्ठ महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

(पोवार डी.एस.)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी
१) मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर.
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सांगली / सातारा / कोल्हापूर .

प्रत माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी
मुख्याध्यापक/ प्राचार्य,
जिल्हा वितरण केंद्रप्रमुख, सांगली / सातारा / कोल्हापूर .
यांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी / मार्च २०२३ परीक्षेचे प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षेचे साहित्य घेऊन मंडळाचे प्रतिनिधी **दिनांक २७/०१/२०२३** रोजी आपल्याकडे येणार असून सदर साहित्य **दिनांक २८/०१/२०२३** रोजी वितरीत करण्यात यावे. तसेच सदर साहित्य घेऊन न गेलेल्या कनिष्ठ महाविद्यालयास संपर्क साधून १००% साहित्य वितरीत करण्यात यावे.